तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, कुडाळ
ग्रामीण रुग्णालय कुडाळ यांची इमारत मागे, मालवण रोड, कुडाळ ४१६५२०
Email kudalnrhm11@gmail.com,
जाक्र.ताआअकु/एनएचएम/आस्था/दरपत्रक/४१/२०२६ दि. 6/11/2026

दरपत्रक मागणी नोटीस

तालुका आरोग्य आरोग्य अधिकारी कार्यालय अंतर्गत शहरी आरोग्यवर्धीनी केंद्र कुडाळ 1 व 2 करिता सन 2026 - 2027 या आर्थिक वर्षात खाली नमुद केलेल्या आवश्यकतेप्रमाणे प्रसिद्धीसाठी वेगवेगळ्या प्रकारचे बॅनर तयार करून घेतले जातात. सदरचे प्रसिद्धी साहित्य तयार करून देणेकरिता इच्छुक दरपत्रक धारकांकडून खालील तपशिलात नमूद केल्याप्रमाणे बंद लखोटयात दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	तपशील	मक्तेदाराने सर्व करासहित व खर्चासहित भरावयाचा दर
1	Flex मटेरियलमध्ये बॅनर प्रिंटिंग तयार करून देणे (अंदाजे २०० स्के. फूट)	मक्तेदाराने सर्व प्रकारच्या साहित्य प्रिंटिंगचा दर प्रती स्के. फूट प्रमाणे देण्यात यावा.
2	Star Flex मटेरियलमध्ये बॅनर प्रिंटिंग तयार करून देणे (अंदाजे १०० स्के. फूट)	
3	Vinyl + Foam sheet मटेरियलमध्ये बॅनर प्रिंटिंग तयार करून देणे (अंदाजे ३०० स्के. फूट)	
4	Backlight Flex मटेरियलमध्ये बॅनर प्रिंटिंग तयार करून देणे (अंदाजे १०० स्के. फूट)	

इच्छुक दरपत्रक धारकांनी सदरची दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून 8 दिवसांपर्यत व शेवटच्या दिवशी दुपारी 03.00 वाजेपर्यत विहित नमून्यात परिपूर्ण दरपत्रक बंद लखोटयातून या कार्यालयास समक्ष आणून अथवा डाक सेवाव्दारे सादर करावयाची आहेत. मुदतीत प्राप्त दरपत्रकांची छाननी करुन अटी व शर्तीपूर्ण झालेली दरपत्रके खोलून तुलनात्मक तक्त्याच्या आधारे किफायतशीर दरपत्रक धारकला पुढील आदेश देणेत येईल.

दरपत्रकाच्या अटी व शर्ती

01) दरपत्रक सादर करतेवळी दरपत्रकासोबत शासकिय संस्थेमार्फत दिलेला नोंदणी दाखला / जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र तसेच नोंदणीपत्रकावर नमूद मालकाचे पॅनकार्ड झेरॉक्स सोबत जोडावयाचे आहेत. दरपत्रक सोबत सादर करावयाच्या बंद लखोटयांत सदरची नोंदणी प्रमाणपत्र व मालकाचे पॅनकार्ड झेरॉक्स सोबत सादर करणें आवश्यक आहे अन्यथा सदरची दरपत्रक नामंजूर करणेत येतील.

02) वरील तपशीलात आवश्यकतेनुसार ज्या दरपत्रक धारकाचे दरपत्रक मंजूर होईल त्यांना कळविण्यांत येईल त्यानुसार ठरवून दिलेल्या दिवशी साहित्य कार्यालयास पोंच करुन व चालू करुन देणे बंधनकारक राहील. त्याकरीता अतीरिक्त कोणत्याही प्रकारचे चार्जेस अदा केले जाणार नाही. मंजुर दरपत्रकातील दर हे 31 मार्च 2027 पर्यत ग्राहय धरणेत येतील.

04) मंजूर दरपत्रकानुसार पुरवठा पूर्ण झालेवर सर्व करांसहित झालेल्या कामाचे देयक त्वरीत कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. प्राप्त झालेला पुरवठयानुसार देयकाची रक्कम संबधीत मक्तेदाराच्या बॅक खातेवर Cheque प्रणालीनुसार जमा करणेत येईल.

05) साहित्य हे वर केलेल्या विवरणा नुसार दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे. तसेच वेगवेगळ्या मॉडेलचे दर स्वतंत्रपणे दरपत्रकामध्ये नमुद करावेत.

Taluka Health Officer
Taluka Kudal

Scanned with OKEN Scanner

06) विहित मुदतीत आदेश दिलेपासून साहित्य पुरवठा न केल्यास शासन नियमानुसार देय दंड देयकामधून केला जाईल.

07) मुदतीत प्राप्त न होणारी एक अगर सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार तसेच सर्व दरपत्रक प्रकीया रद्द करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

Taluka Health Officer
Taluka Kudal

दरपत्रक मागणी नोटीस लावण्याचे ठिकाण

01) तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, कुडाळ नोटीस बोर्ड ग्रामीण रुग्णालय कुडाळ इमारतीच्या मागे नोटीस बोर्ड

02) www.nrhm.maharashtra.gov.in

03) www.arogya.maharashtra.gov.in

वरील संकेतस्थळावर दरपत्रक नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून 8 दिवसाच्या मुदतीत दरपत्रक स्वीकारली जातील याची नोंद घ्यावी.

Taluka Health Officer
Taluka Kudal

Scanned with OKEN Scanner